




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड


व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com









वर्ष २ रे | अंक : ६८५. वा | मंगळवार | दि. २० फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# महसूल विभागात फक्त कागदांचा खेळ चाले...

## टाईमपासच्या नौटंक्या सुरूच, भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई शून्य...

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील महसूल विभागात एकीकडे भ्रष्टाचार आपल्या अत्युच्च पातळीवर पोहोचलेला असताना दुसरीकडे या भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी महसूल प्रशासन मात्र केवळ कागदांचे खेळ करण्यात मश्गुल आहे. बुलढाण्यापासून ते अमरावती महसूल कार्यालयापर्यंत सगळीकडे सध्या मेळ नसलेल्या फक्त कागदांचा खेळ सुरू आहे. भ्रष्टाचाऱ्यांवर प्रत्यक्ष कारवाई करण्यास मात्र महसूल विभागाचे प्रशासन कचरत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. येथील महसूल विभागात बोकाळलेल्या अनिर्बंध भ्रष्टाचाराच्या अत्यंत सुरस कथा सिटी न्यूज दैनिक जनसंचलनच्या वतीने गेल्या सुमारे दीड वर्षापासून सातत्याने प्रकाशित करण्यात येत आहे. भ्रष्टाचाराविरोधात सिटी न्यूज दैनिक जनसंचलनची सुरू झालेली एक अत्यंत कठीण व कणखर अशी मोहीम आजही अविरतपणे सुरूच आहे. भ्रष्टाचाराच्या निबिड अंधारात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सत्याचा प्रकाश घेऊन मिणमिणत आहे. परंतु महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी हे अक्षरशः धृतराष्ट्र बनल्याचे दिसून येत आहे. या अधिकाऱ्यांना आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार अजिबात दिसत नाही. किंबहुना या भ्रष्टाचाराला दडपण्याचे काम महसूलचे अधिकारी करीत आहेत. याचा प्रत्यय दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजला पदोपदी येत आहे. दैनिक जनसंचलन ने जेंव्हा महसूल विभागातील भ्रष्टाचाराविरोधात वृत्तमालिका प्रकाशित करणे सुरू केले, तेंव्हा आम्ही नुसती वृत्तमालिका प्रकाशित करून आपली जबाबदारी झटकली नाही. तर महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे व त्यांच्या भ्रष्टाचारात निर्लज्य होऊन साथ देणारे तहसीलदार रुपेश खंडारे यांच्या गैरव्यवहारंचे पुरावे बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांपासून ते अमरावती महसूल आयुक्तांपर्यंत सर्वांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. खरे तर हे पुरावे दिल्यानंतर कोणताही प्रामाणिक अधिकारी दोषी कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई केल्याशिवाय राहणार नाही. परंतु खालपासून वर पर्यंत भ्रष्टाचारी यंत्रणा जेथे बसलेली आहे, तेथे कारवाईची कसली आलीए अपेक्षा. त्यामुळेच की काय भ्रष्टाचार करणाऱ्यांना आज बुलढाणा महसूल विभाग हे भ्रष्टाचाराचे मुक्त कुरण म्हणून उदयास आले आहे. विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणात एक बाब प्रकर्षाने पुढे आली ती, म्हणजे महसूल विभागात असलेला भयंकर राजकीय हस्तक्षेप. विजय दत्तात्रय टेकाळे हे काही लोकप्रतिनिधींशी संधान साधुन आपल्याच विभागाच्या अधिकाऱ्यांवर दबाव आणतात. म्हणूनच उपविभागीय अधिकारी किंवा निवासी उपजिल्हाधिकारीच काय, परंतु खुद्द जिल्हाधिकारी देखील एका मंडळ अधिकाऱ्यावर कारवाईपासून कचरत आहेत. जिल्हाधिकाऱ्यांची लाचारी ही एव्हढ्या खालच्या पातळीवर पोहोचली आहे की, महसूल आयुक्त कार्यालयातून टेकाळे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश प्राप्त झाल्यानंतर आणि कारवाईचे स्मरण पत्र प्राप्त झाल्यानंतर त्याला देखील जिल्हाधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवली आहे. आता जिल्हाधिकाऱ्यांची इतकी लाचार आणि मजबूर स्थिती असेल तर मग बाकीच्यांबाबत बोलायलाच नको. निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांपासून तहसीलदारांपर्यंत सर्वच जण केवळ कागदी घोडे नाचवणे, कागदांचे खेळ रचणे, यापलिकडे काहीही करीत नाही. एक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याच्या कोर्टात चेंडू टाकून मोकळा होतो. भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई केल्याचे खापर आपल्या माथी फुटू नये, याचा प्रयत्न सगळेच करीत आहेत. यासाठी मग वरिष्ठांच्या आदेशाचा कागद एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर जाण्यासाठी अनेक दिवस व प्रसंगी महिने देखील लागतात. यापेक्षा पुढे जाऊन जर वरिष्ठांचे आदेश प्राप्त झालेच, तरी त्यावर कारवाई केली जात नाही. इतकी टोकाची लाजारी आणि निर्लज्जपणाचा कळस महसूल विभागातील अधिकारी गाठत आहेत. एकीकडे हे सगळे होत असताना आपल्या अधिकाऱ्यांची लाचार स्थिती पाहून मस्तवाल झालेल्या मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्यासारख्या महाभ्रष्ट अधिकाऱ्यांचे चांगलेच फावते. असले अधिकारी मग आपल्या अधिकाऱ्यांना ठेंगा दाखवत दिवसाढवळ्या, उघडपणे भ्रष्टाचार करीत राहतात. अनेकदा वरिष्ठ अधिकारी याकडे दुर्लक्ष करतात किंवा कधी-कधी तर थेट भ्रष्टाचारात सामिल होतात. तोच प्रकार बुलढाण्याचे तहसीलदार रुपेश खंडारे यांनी केला. त्यांनी केवळ सनद देण्याचा अधिकार असताना मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांच्या बेकायदेशीर संपत्तीबाबत पदाचा गैरवापर करून चक्क अकृषक आदेश काढला. खरेतर खंडारे यांनी हा प्रकार अज्ञानातून केलाच नाही. कारण तालुका दंडाधिकारी असलेला अधिकारी असली चूक करू शकत नाही. याचा अर्थ हा भ्रष्टाचार ठरवून आणि जाणुनबुजून झालेला आहे. या भ्रष्टाचारावरही पांघरुण घालण्यासाठी महसूल विभागातील अधिकारी वाट्टेल त्या थराला जाण्याचा प्रकार करीत आहेत. हे सर्व पाहून महसूल प्रशासनाचा खेळखंडोबा जगजाहीर झाला असून, भ्रष्टाचाराचे कुरण आज महसूल विभाग बनलेला आहे. दुसरीकडे कारवाईचा दिखावा करण्यासाठी दिवसरात्र येथे कागदांचा खेळ चाले, अशी स्थिती आहे. असे असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र जोपर्यंत महसूल विभागाच्या भ्रष्टाचाऱ्यांना कारवाई होत नाही, तोपर्यंत पणतीसारखा सत्याचा प्रकाश देत राहणार आणि भ्रष्टाचाऱ्यांना प्रकाशात आणण्याचे काम करीत राहणार.




अजून बरेच काही पुढील भागात...

# मलकापुरात ४० वर्षीय व्यक्तीने केली आत्महत्या

**जनसंचलन/मलकापूर**

शहरातील शास्त्रीनगरात वास्तव्याला असलेल्या ४० वर्षीय एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी दुपारी उघडकीस आली. कौटुंबिक कलहातून मानसिक स्वास्थ्य बिघडल्याने त्याने हे पाऊल उचलल्याचे चिठ्ठीतून स्पष्ट झाले आहे. प्राप्त माहितीनुसार, नीलेश रामचंद्र पाटील हा तरुण गेल्या काही दिवसांपासून येथील शास्त्रीनगरात दिवाणी कोर्टानजीकच्या एका खोलीत पत्नी व कुटुंबासमवेत भाड्याने वास्तव्याला होता. त्याने राहत्या घरी छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना उघडकीस आल्यानंतर लगेच पोलिसांना कळविण्यात आले. नीलेश पाटील याने मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत कौटुंबिक कलहातून मानसिक स्वास्थ्य बिघडल्याने आत्महत्या केली, असे नमूद असल्याचे पोलिसांनी सांगितले. मृताच्या पश्चात



पत्नी व अपत्ये आहेत. त्याचा प्रेमविवाह झाला होता, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# विद्यार्थिनीचा विनयभंग; गुन्हा दाखल

**जनसंचलन/ खामगाव**

तालुक्यातील एका गावातील १५ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीचा घरी जात असताना विनयभंग केल्याची घटना १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.४५ वाजता घडली. याप्रकरणी पोलिसांनी तक्रारीवरून आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे. विद्यार्थिनी घराकडे जात असताना आकाश सूर्यभान कळसकार (२६) याने तिचा पाठलाग करून तिला लज्जा



पोहोचेल असे कृत्य करत विनयभंग केला. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा




जिल्हा परिषदेच्या यावर्षीच्या सेस फंडातून जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिला आणि मुलींकरिता वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ थेट हस्तांतरणाने देण्यात येणार आहे. यासाठी दि.२२ फेब्रुवारी २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे. या योजनेतून ग्रामीण भागातील दिव्यांग महिला व दिव्यांग मुलींना पिठाची चक्की पुरविणे आणि ग्रामीण भागातील महिला व मुलींना पिको व फॉल मशिन पुरविण्यात येणार आहे. सदर योजनांचे अर्ज हे प्रत्येक तालुक्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय येथे उपलब्ध आहेत. लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांसह अर्ज भरावे लागणार आहे. अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्राधान्य देण्यात येणार आहे. योजनेशी संबधित अर्ज तसेच अटी व शर्ती कार्यालयात, तसेच प्रत्येक तालुक्यातील सर्व बालविकास प्रकल्प कार्यालय व zp-buldhana.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे जिल्हा परिषदेचे बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविले आहे.

# शारीरिक शिक्षण शिक्षकांचे प्रशिक्षण शिबीर उत्साहात संपन्न...

जनसंचलन/बुलडाणा




जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे जिल्हास्तर शारीरिक शिक्षण शिक्षकांचे निवासी प्रशिक्षण शिबिर दि. ९ ते १६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान जिल्हा क्रीडा संकुलात पार पडले. सदर प्रशिक्षण शिबीरात क्रीडा शिक्षकांना उजळणी म्हणून विविध खेळात झालेले बदल, खेळामधील बदललेले तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या पध्दती, खेळामधील कौशल्याची ओळख, नवीन खेळांची ओळख, खेळांची शास्त्रोक्त माहिती, क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानात भर पडावी व वेळोवेळी क्रीडा क्षेत्रामध्ये होणारे बदल अवगत याबाबत माहिती देण्यात आली. सदर शिबीराकरीता योगासाठी डॉ. तृप्ती महाले, आहार शास्त्रासाठी डॉ. साधना भवटे, स्पोर्टस् इन्जुरीबाबत डॉ.अनुप इंगळे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. लता बाहेकर, स्काऊट आणि गाईडकरीता श्री. आठवले, श्रीमती पवार आणि विविध खेळांसाठी तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले. शिबीराचा समारोप दि.१६ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आला. यावेळी क्रीडा उपसंचालक विजय संतान, जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर, व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव संजय नाईक उपस्थित होते. यात राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. शिबीर प्रमुख उज्वला लांडगे प्रास्ताविक केले. सतीशकुमार पडूळकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रविणकुमार राठोड यांनी आभार मानले.

# चिखलीत महासंस्कृती महोत्सव तालुका क्रीडा संकुलात तीन दिवस लोककलांचा उत्सव नागरीकांनी लाभ घेण्याचे आवाहन

## नागरीकांनी लाभ घेण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलडाणा




पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे चिखली येथील तालुका क्रीडा संकुलात दि. २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान तीन दिवसीय महासंस्कृती महोत्सव घेण्यात येणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन मंगळवारी, दि. २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. या महोत्सवाचा नागरीकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. उद्घाटन कार्यक्रमाला पालकमंत्री दिलीप वळसे पाटील, वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार प्रतापराव जाधव, रक्षा खडसे, आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धीरज लिंगाडे, डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. संजय कुटे, संजय रायमुलकर, संजय गायकवाड, ॲड. आकाश फुंडकर, राजेश एकडे, श्वेता महाले, सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिव जयश्री भोज, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, जिल्हा पोलिस अधीक्षक सुनिल कडासने, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे आदी उपस्थित राहतील.

चिखली येथील तीन दिवसीय महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमासह कवी संमेलन, लोककलांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यात मंगळवार, दि. २० फेब्रुवारी रोजी ङ्गनक्षत्रांचे देणेफ कार्यक्रमात गायक ऋषिकेश रानडे आणि आनंदी जोशी हे सुधीर फडके आणि आशा भोसले यांची मराठी, हिंदी गाणी सादर करतील. बुधवार, २१ फेब्रुवारी रोजी ङ्गजागर लोक कलेचाफ कार्यक्रमात पारंपरिक दंडार, भारुड, गोंधळ, पोवाडा, वासुदेव या लोककला सादर करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्रातील नामांकीत कवींचे कवी, हास्यकवी संमेलन होईल. त्यानंतर दीप्ती आहेर आणि समूह पारंपरिक लावणी सादर करतील. गुरुवार, २२ फेब्रुवारी रोजी ङ्गमहाराष्ट्राची लोकधाराफ या महाराष्ट्राची संस्कृती दर्शविणारा कला आविष्कार अनिरुद्ध जोशी आणि सहकलाकार सादर करतील. तसेच गौरी थोरात ह्या ङ्गराजमाता जिजाऊसाहेबफ यांच्या जीवनावर आधारित एकांकिका सादर करतील. तसेच दि. २० ते २२ फेब्रुवारी २०२४ दरम्यान सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चिखली येथील परमहंस रामकृष्ण मौनी बाबा संस्थान येथे स्थानिक नागरिकांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भजन मेळावा आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय याठिकाणी बचतगटांच्या स्टॉल्सच्या माध्यमातून खाद्य संस्कृतीचे आयोजन करण्यात आले आहे. महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन संस्कृतीचे आदान-प्रदान करण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे. याठिकाणी नागरिकांनी विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे. नागरिकांनी सांस्कृतिक आणि लोककलांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# वीज चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

जनसंचलन/ शेगाव

शेगाव ग्रामीण परिसरात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वतीने वीजचोरी शोध मोहिमेंतर्गत लासुरा खुर्द ता. शेगाव येथे वीजचोरीचे प्रकरण उघडकीस आले. त्या प्रकरणी खामगाव ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तालुक्यातील लासुरा खु. येथे पथकाने रहिवासी प्रकाश बलदेव जवंजाळ यांच्या घरातील विद्युत पुरवठ्याची तपासणी केली. त्यांनी त्यांच्या घराजवळील इलेक्ट्रिक पोलवरून काळ्या रंगाचा वायर अनाधिकृतपणे जोडून, आकोडा टाकून घरात थेट वीजपुरवठा घेऊन विजेची चोरी केल्याचे, तसेच त्याच्या घराजवळ अधिकृत मीटर आढळून आले नाही. मागील १२ महिन्यांमध्ये ६२१ युनिटची रक्कम ९,१५० रुपये, तसेच (तडजोडीची रक्कम २००० रुपये) असे एकुण ११,१०५ रुपयांची वीजचोरी केल्याचे तक्रारीत म्हटले. त्यावरून खामगाव ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ कलम १३५ प्रमाणे वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस करीत आहेत. गत काही दिवसापासून वीज चोरी वाढली आहे.

# कुमरिकेस फूस लावून पळविले ३४ वर्षीय इसमावर गुन्हा...

जनसंचलन/संग्रामपूर

सोनाळा सातपुड्यातील एका आदिवासी गावात १४ वर्षीय अल्पवयीन कुमारिकेस गावातील ३४ वर्षीय इसमाने फूस लावून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सोनाळा पो.स्टे. मध्ये १८ फेब्रुवारी रोजी अप नं. ४२/२४ कलम ३६३ भादंविनुसार आरोपी अनारसिंग गुलाबसिंग सोळंके विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातपुड्यात १५ फेब्रुवारीला रात्री उपरोक्त आरोपीने १४ वर्ष ८ महीने २४ दिवसाच्या अल्पवयीन कुमारिकेस फूस लावून पळवून नेले. रात्री ९ वाजताच्या सुमारास जेवण झाल्यावर अल्पवयीन मुलीसह घरातील सर्वजण झोपले. अल्पवयीन मुलीचे वडील पहाटे ४ वाजता दरम्यान लघुशंकेसाठी उठले असता घरात मुलगी दिसून आली नाही. घरातच काही वेळ वाट पाहल्यावर वडील, आई व भाऊ यांनी गावात मुलीचा शोध घेत विचारपूस केली. मात्र मुलगी दिसून आली नाही. आरोपीने मुलीला पळविले असल्याचे स्पष्ट झाले. तू मला सोडून गेली तर मी आत्महत्या करणार अशी धमकी देत आरोपीने अल्पवयीन मुलीवर दबाव टाकला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



## दै. सांज सावलीचे उपसंपादक राजेश लोखंडे पाटील यांची पुरोगामी पत्रकार संघाच्या बुलढाणा उपाध्यक्ष पदी निवड

**जनसंचलन/ चिखली**

अनेक वर्षापासुन पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्राप्त दै. सांज सावलीचे उपसंपादक श्री राजेश लोखंडे पाटील यांची पुरोगामी पत्रकार ( भारत ) संघाच्या बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष मा. विष्णुजी कंकाळ यांनी राजेश लोखंडे पाटील यांची पुरोगामी पत्रकार संघाच्या बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड केली. यावेळी राजेश लोखंडे पाटील यांना निवुक्ती पत्र देऊन त्यांची बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती केल्याचे पुरोगामी पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष श्री विष्णूजी कंकाळ यांनी जाहीर केले.



यावेळी पत्रकार संघाचे जिलहाध्यक्ष विश्वास कंकाळ, पत्रकार तथा जिल्हा महा सचिव हरसिंग छर्रे उपस्थित होते. त्यांच्या निवडीमुळे बुलढाणा जिल्ह्यात तसेच विशेष चिखली जिल्ह्यात पत्रकारा मध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे तसेच त्यांचे सर्व स्तरातून स्वागत व शुभेच्छेचा वर्षाव होत आहे

## अपार कष्टाशिवाय ध्येय गाठता येत नाही - एन बी धुमाळ...



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

जिवनात हे फारच खडतर खडतर आहे यामध्ये आपण का आलो याचा विचार करून वागा मरण्यापूर्वी काय कराचे हे ठरवा जिवनात करीयर घडवयाचे असेल तर शिक्षण घेवून ज्ञान संपादन करावे लागते ज्ञान हे यशाचे मुलमं आहे त्यामुळे अपार कष्टाशिवाय ध्येय गाठता येत नाही असे प्रतीपादन उद्योजक तथा प्रख्यात लेखक व व्याख्याते एन बी धुमाळ यांनी तालूक्यातील जऊळका येथे प्रताप सानप यांनी आयोजित नवयुवकांच्या यशस्वीतेच्या उज्वल भविष्यासाठी विद्यार्थी व पालकांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शनात बोलतांना केले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ कायंदे हे होते तर प्रमुख उपस्थितीत सरपंच गजानन मुंडे युवा सेनेचे सिध्देश्वर आंधळे दिलीप सानप उद्योजक सोपान केदार हे होते पुढे बोलतांना धुमाळ म्हणाले की, मुलांना मोबाईल देवू नका आजचे शिक्षण हे कामी नाही कारण आजच्या शिक्षण पद्धती मध्ये मुलांना नापास करत नाही त्यामुळे आपले मुल यशस्वी होत नाही आज नोकरी मिळणे कष्टीण आहे त्यामुळे अनेकांना व्यवसायाकडे वळावे लागते यातही आपार कष्ट केल्याशिवाय यशस्वी होत नाही जिवणात चांगले कर्म असले तर फळ चांगले च मिळणार या जगात अनेक लोक असे की त्यांच्याकडे दुसर्यांना द्यायला खूपकाही आहे पण ते देत नाही ते तसेच मरतात प्रेम व मानूसकीला द्यायला पैसे लागत नाही मानूस हा संस्काराने घडतो आज गावा गावातील मंदीरावर करोडो रू खर्च करुन ते उभे करताहेत पण गावातील प्रा शाळा चांगल्या नाहीत ज्यामधुन आपले मुल घडणार आहे मंदीरासोबत ग्रामस्थांनी शाळेकडही लक्ष द्यायला पाहीजेत ग्रामीण भागातील मुलं चांगले शिकत नाही त्यानंर लगेच युवा नेते होतात आपल्याला राजकारणाची नाही तर अर्थकारणाची गरज आहे मारवाडी ब्राम्हण वाण्यांची मुल यात दिसत नाही तर ते व्यवसायात जातात नौकरी नाही मिळाली तर व्यवसायाकडे वळा कष्ट केले तर मानूस मरत नाही पण वाईट मार्गाने गेलात तर मरणारच आहे याचा विचार तरुणाईनी केला पाहिजेत ही आजच्या काळाची गरज आहे त्यामुळे चांगली संगत व वाईट विचार बदला आई व वडीलाचे उपकार सात पिढ्या फेडता येत नाही आपण जे काही आहे ते त्यांच्यामुळेच आहोत त्यांना म्हातार-पणी का विसरता अशी खंत व्यक्त करुन आई व वडीलांना आपण प्रेम द्यावे असे शेवटी अवाहन केले यावेळी असंख्य गावकरी व महीला उपस्थित होत्या

## आंदोलनाच्या दणक्यामुळेच अवकाळी,गारपीटीची मदत मंजूर; आता श्रेय घेण्यासाठी काही नेते समोर येतील - रविकांत तुपकर

**जनसंचलन/बुलढाणा**




अवकाळी पाऊस आणि गारपीटीची मदत मजूर झाली आहे, निवडणूकीच्या तोंडावर ही मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, हे आपल्या आंदोलनाचे यश आहे. आंदोलनाच्या दणक्यामुळेच ही मदत मिळणार आहे. मंत्रालय ताबा आंदोलनावेळी या मदतीसंदर्भातचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या बैठकीत दिले होते. तसेच अधिवेशनातही त्यांनी यासंदर्भात घोषणा केली होती. परंतु आता काही नेते याचे श्रेय घेण्यासाठी पुढे येत आहे, असे प्रतिपादन शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सावळी येथे ङ्गएल्गार परिवर्तन मेळाव्याप्त आयोजित सभेत बोलतांना केले. बुलढाणा तालुक्यातील धाड जवळील सावळी येथे १८ फेब्रु. रोजी एल्गार परिवर्तन मेळावा पार पडला. यावेळी तरुणांनी रविकांत तुपकर यांचे जंगी स्वागत करुन बैलगाडीतून मिरवणूक काढली. गावात ठिकठिकाणी तुपकरांचे स्वागत करण्यात आले, महिलांनी औक्षण केले. त्यानंतर आयोजित सभेत शेतकरी, कष्टकरी, सामान्य नागरिक, महिला आणि तरुणांची मोठी गर्दी होती. यावेळी बोलतांना रविकांत तुपकर यांनी सांगितले की, दुष्काळ,अतीवृष्टी आणि गारपीटीची मदत मिळावी यासाठी आपण वारंवार आंदोलने केली आहेत. एल्गार मोर्चानंतर मुंबईतील मंत्रालय ताबा आंदोलनादरम्यान २९ नोव्हेंबर रोजी सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या बैठकीत सोयाबीन-कापूस दरवाढ यासह दुष्काळ, अवकाळी व गारपीटीची मदत यासह मागण्या आक्रमकपणे मांडल्या होत्या. त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळ, अवकाळी व गारपीटीच्या मदतीसंदर्भात शब्द दिला होता व त्यासंदर्भातील सुतोवाच ही त्यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात केले होते. त्यानुसार आता बुलढाणा जिल्ह्यातील गारपीट व अवकाळी पावसाने बाधित असलेल्या २ लाख ७६ हजार ५७५ शेतकऱ्यांना २२० कोटी ३४ लाख रुपयांची मदत मंजूर झाली आहे. ही मदत लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली तर त्याचे श्रेय रविकांत तुपकर आणि शेतकऱ्यांच्या आंदोलनाला जाईल म्हणून ही मदत तातडीने जमा न करता आता निवडणुकीच्या तोंडावर जमा केली जात आहे, मात्र या मदतीसाठी आम्ही केलेली आंदोलने जनता विसरली नाही. त्यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लोकप्रतिनिधी बोलायला तयार नव्हते आणि आता श्रेय घेण्यासाठी काही जण पुढे येतील पण जनतेला सर्व समजते, आता कुणी कितीही श्रेय घेण्याचा प्रयत्न केला तरी शेतकऱ्यांना वस्तुस्थिती माहिती आहे, असा घणाघात यावेळी बोलतांना रविकांत तुपकर यांनी केला. तातडीने मंजूर झालेली रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा, त्याचबरोबर दुष्काळाची मदत व पिकविमाही तातडीने शेतकऱ्यांना द्या, तसेच सोयाबीन-कापसाला प्रति क्विंटल तीन हजार रुपये बोनस द्या, अशी मागणी देखील रविकांत तुपकरांनी या मेळाव्यादरम्यान केली. याप्रसंगी मंचावर रिजवान सौदागर, गजानन लांडे-पाटील, अंकुशराव वाघ, तुळशिरामदादा काळे, डॉ. विनायक वाघ, आकाश माळोदे, प्रभूसेठ वाघ, राजेंद्र नागवे, सदाशिव जाधव, पुरुषोत्तम पालकर, तुळशीराव वाघ, विनायक वाघ, समाधान नागवे, प्रदीप टाकसाळ, दगडू साखरे, गणेश वाघ, अमोल देवकर, प्रकाश सपकाळ, डी.एन. सपकाळ, एकनाथ वाघ, वैभव वाघ, नेहरूसिंग मेहर, राजू धनावत, गोपाल राजपूत, संदीप वाघ, गुलाब जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तर या मेळाव्याचे आयोजन समस्त सावळी गावकऱ्यांनी केले होते व या मेळाव्यासाठी हिंदूधर्मरक्षक ग्रुप सावळी व सुवर्ण गणेश मित्र मंडळाच्या युवकांनी प्रचंड मेहनत घेतली.

## पॉयझनने दगा दिला,अपघातात गेम झाला गोरेगाव येथील युवकाचा मृत्यू

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

साखरखेर्डा येथून जवळच असलेल्या गोरेगाव येथील एका युवकाने विष-री औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, तो प्रयत्न फसला म्हणून चक्क रुग्णालयातून धूम ठोकली, तोच त्याला एका वाहनाने धडक दिली आणि त्याचा मृत्यू झाला. उपरोक्त घटना १७ फेब्रुवारी रोजी घडली. याबाबत हकिकत अशी की, गोरेगाव येथील गणेश विनायक पंचाळ वय २९ याचे पदवीपर्यंत शिक्षण झाले होते. शिक्षण झाल्यानंतर वडिलांच्यासोबत शेतात काम करीत, होता. ४ एकर शेती, भाऊ, भाव-ाची मुल असा परिवार असतांना केवळ । शेतीच्या तुटपुंज्या उत्पादनावर प्रपंचाचा गाडा कसा चालेल. या विवंचनेत असतांना १४ फेब्रुवारी रोजी शेतातच गणेश पंचाळ




याने विषारी औषध प्राशन केले. तातडीने त्याला साखरखेर्डा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार करुन बुलढाणा येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतू प्रकृती चिंताजनक असल्याचे अकोला येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचार सुरू असताना शुक्रवारी प्रकृतीत सुधारणा झाली. परंतू जिवनाला कंटाळलेल्या गणेशने रुग्नालयात उपच-ार सुरू असताना सलाईन व इतर ठिकाणी लावलेल्या नळ्या काढून फेकल्या आणि रुग्णालयातून एकच धूम ठोकली. पळताना एका अज्ञात वा-हनाची धडक त्याला बसली. त्यात दोन्ही पाय निकामी झाले. मदतीला अकोला येथील पोलीस धाऊन आली. त्याच्या अंगावरील रुग्णालयातील कपडे पाहून पोलीसही चकित झाले. नेमका हा काय प्रकार आहे. तरीही पोलीसांनी शासकीय रुग्णालयात नेले, तेथे गेल्यानंतर संपूर्ण हकिकत कळाली, पण तो जगला पाहिजे. म्हणून पुन्हा वैद्यकीय अधिकारी त्यांच्यावर उपचार करु लागले. तो रुग्णालयात थांबायला तयार नव्हता, अखेर डॉक्टरांनी उपचार करुन कुटुंबाच्या स्वाधीन केले. मामा विठ्ठल काकडे त्याला घरी घेऊन आले, आणि काळाने त्याच्यावर झडप घातली. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी त्याचा मृत्यू झाला. त्याच्या या अपघाती मृत्युमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.











## हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना शासकिय कार्यालय तसेच शहरात विविध ठिकाणी अभिवादन





# बुलढाणा शहरात मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी...

## ५१ तोफांची सलामी ठरली आकर्षण,पाच गडावरील जलमातीने अभिषेक

**जनसंचनल/बुलढाणा**

शहरासह जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती दि. १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जिल्ह्यात सर्वत्र भगवे ध्वज, पताका डौलाने फडकत असतानाच सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल यंदाच्या सार्वजनिक शिवजयंती उत्सवाचे आकर्षण ठरले. शहरामध्ये गत आठदिवसापासूनच विविध कार्यक्रम आयोजित केले होते. सोमारी सायंकाळी मुख्य शोभायात्रेस प्रारंभ झाला. यात हत्ती, उंटांवर पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेला युवावर्ग सर्वांचे आकर्षण बनला होता, सकाळी बुलढाणा येथील जिजामाता प्रेक्षागारामध्ये शिवजन्मोत्सवाचा मुख्य सोहळा पार पडला, याव-ेळी उपस्थित महिलांनी पाळणा म्हणत शिवजन्मोत्सव साजरा केला. सोबतच पाच गडांवरून आणलेल्या जलमातीने यावेळी अभिषेक करण्यात आला. शिवजन्मोत्सव लोकोत्सव करण्याच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने यंदा नियोजन केले होते, गेल्या एक आठवडयापासून विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येत होते. १९ फेब्रुवारीला सायंकाळी पाच वाजता संगम चौकातील शिवस्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करून तथा खा. प्रतापराव आधव यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर मुख्य शोभायात्रेला प्रारंभ झाला. व्याख्यानातून केले समाज प्रबोधन सकाळी शिवजन्मोत्सवाचा कार्यक्रम झाल्यानंतर गजाननदादा शास्त्री यांचे क्रांतिकारी शिवशंभू चरित्रकारया विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील सपकाळ यांनी केले, यावेळी समिती अध्यक्ष आ. संजय गायकवाड यांचेही समयोचित भाषण झाले. व्याख्यानातून समात्ताचे प्रबोधन करण्यात आले.



## शोभायात्रेतील देखावे ठरले आकर्षण



शोभायात्रेत विविध ढोल पथक, इतिहासातील महापुरुष व महिलांच्या अश्वारूढ वेशभूषा केलेल्या व्यक्ती शोभायात्रेचे आकर्षण ठरले. डॉ. बाबासाहेब आबेडकर, माता रमाई, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, संत गाडगेबाबा यांच्यासह रामायणातील राम, लक्ष्मण, सीता, हनुमान यांच्या वेशभूषा बालकांनी शोभायात्रेत साकारल्या होत्या, भजनी मंडळ व दिडी पथका शोभायात्रेच्या अग्रस्थानी होते. बंजारा बांधवांचे नृत्य व महाकालच्या वेशभूषेतील नियंत देखावा लक्षवेधी ठरत होता. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष आ. संजय गायकवाड यांच्या नियोजनात शोभायात्रेचे आयोजन देखणे व सुंदर असल्याचे दिसून येत होते. उट. हत्ती, घोडे, पालखी शोभायात्रेत सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. संगम चौक, जयस्तंभ चौक मार्गे ही शोभायात्रा शहरातील मुख्य मार्गावरून निघून नंतर संगम चौकात यात्रेचा समारोप झाला.

## लग्न सोहळ्यानंतर घराकडे निघाल्या; मायलेकींना वाटेतच मृत्यूनं गाठलं, चिमुकलीच्या जाण्यानं गाव हळहळलं

**जनसंचलन/नांदूरा**

जिल्ह्यातून एक दु:खद घटना समोर आली आहे. लग्न समारंभ आटोपून घरी येत असताना झाडेगावजवळ आल्यानंतर ऑटोला जीपने धडक दिली. या घटनेत पाच वर्षांची मुलगी आणि आईचा मृत्यू झाला आहे. ही घटना १८ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजताच्या दरम्यान घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुलढाणा जिल्ह्यातील मानेगाव येथील रहिवासी रुखमा शांताराम रत्नपारखी त्यांची सासू आणि दोन मुलीं-सह लग्न समारंभाला गेल्या होत्या. परत येताना झाडेगाव जवळ त्यांच्या ऑटोला नांदुऱ्याकडून पिंपळगाव काळेकडे जात असलेल्या जीपने धडक दिली. अपघातात पूर्वी शांताराम रत्नपारखी (५) हिचा मृत्यू झाला आहे. तर तिची आई रुख्मा शांताराम रत्नप-ारखी (३८) यांना गंभीर अवस्थेत खामगाव येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या अपघातात हिंगणे मानकर येथील रमेश वैतकार यांच्यासह ऑटोचालक जखमी झाले. अपघात झाल्यानंतर जीपचा चालक फरार झाला आहे. पुढील तपास जळगाव जामोद पोलीस करत आहेत. दरम्यान घटनास्थळी झाडेगाव पोलीस पाटील सारंगधर खाळपे आणि श्रीनाथ यांच्यासह मानेगाव, झाडेगाव येथील रहिवाशींनी जखमींना तात्काळ दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. लग्न समारंभानंतर घराकडे जाताना मृत्यू आपली वाट पाहत आहे, हे आई आणि मुलीला स्वप्नात देखील कधी वाटलं नसेल. या अच-ानक घडलेल्या घटनाक्रमामुळे वऱ्हाडी मंडळींमध्ये शोककाळा पसर-ली आहे. तर दुसरीकडे गावात देखील हळहळ व्यक्त केली जात आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958